दिनांक ०३.११.२०२५ रोजी –

अभियोग पक्षाचा सा.क्र.१ श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर उलटतपासणी सुरु,
आरोपी पक्ष क्र.८ व ९ करीता विद्वान श्री. एम. आर. जाधव, विधीज्ञ यांच्यातर्फे सुरु –

८६. मी फिर्याद दाखल करतांना क्रिडा संकुलात क्रिडा अधिकारी म्हणून नियुक्त होतो. क्रिडा संकुलात आर्थीक गैरव्यवहार झाला असेल तर गैरव्यवहाराची दखल घेण्याची जबाबदारी ही उपसंचालक तथा सचिव विभागीय क्रिडा संकुल समिती यांची असते. विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये उपसंचालक तथा सचिव हे उपलब्ध नसतील तर पर्यायी अधिकारी म्हणून त्यांचे कामकाज कोण पाहते या विषयीची व्यवस्था नाही. आमच्याकडे जे काही कर्मचारी, अधिकारी काम करतात त्यांची कार्यालयीन कामकाजाची जबाबदारी ही लिखीत स्वरुपात ठरविण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयीन कर्तव्य यादीप्रमाणे आर्थीक गैरव्यवहारासंबंधात फिर्याद करायची जबाबदारी ही माझी नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्थीक गैरव्यवहार झाले असतील तर जो अधिकारी किंवा कर्मचारी व्यवहार संभाळतो त्याचीच फिर्याद दाखल करायची जबाबदारी आहे.

८७. माझे शिक्षण एम.पी.एड–सेट असे झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वित्त व लेखा या संदर्भातील नोंदी घेण्याचा अथवा तपासण्याचे शिक्षण मी घेतलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्थीक व्यवहारासंबंधामध्ये बँकेशी कशा प्रकारे व्यवहार केल्या जातात अथवा बँकेत खाते कसे उघडले जाते या संबंधातील प्रशिक्षण मी घेतलेले नाही. मी जे काही आर्थीक व्यवहारा विषयी कथन केले त्या व्यवहारांची मी फिर्याद देण्यापुर्वी वैयक्तीक तपासणी केली. हे म्हणणे खरे आहे की, क्रिडा संकुलाचे आर्थीक व्यवहारा संबंधातील बँक खाते हे उपसंचालक तथा सचिव यांचे सहीने चालत होते. हे म्हणणे खरे आहे की, श्री. सबनीस यांचे पुर्वी श्री. सुहास पाटील हे होते व त्यांच्या पुर्वी श्री. अशोक गीरी हे अधिकारी होते. हे म्हणणे खरे आहे की, क्रिडा संकुलाचे खाते हे उपसंचालक तथा सचिव यांचेच सहीने उघडले गेले होते. हे मला सांगता येणार नाही की, क्रिडा संकुलाचे बँकेतील खाते सन–२०११ साली उघडले होते. हे म्हणणे खरे नाही की, जेंव्हा पासून हे खाते उघडले तेंव्हापासून उपसंचालक तथा सचिव यांच्या एकट्याच्याच सहीने हे खाते चालविले जात होते. उपसंचालक/ सचिव यांच्या व्यतिरीक्त फिर्यादमध्ये क्रिडा संकुलाचे खाते चालविण्यासाठी इतरांची सही आवश्यक होती असे असे कुठेही नमुद करण्यात आलेले नाही.

८८. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २६.०९.२०२३ रोजी च्या पत्रांने क्रिडा संकुलाच्या खात्यामध्ये श्री. सुहास पाटील यांच्या सहीच्या ऐवजी श्री. संजय सबनीस यांच्या सहीने खाते चालवावे असा बदल करण्यात यावा बद्दल बँकेला कळविले होते. क्रिडा संकुल समितीचा अथवा कार्यालयाचा या दिनांक २६.०९.२०२३ रोजीच्या पत्राबद्दल काहीही आक्षेप नाही.

८९. हे म्हणणे खरे आहे की, बँकेला नेट बँकीगद्वारे क्रिडा संकुलाचे खाते फक्त व्ह्यु फॅसिलीटी

अशा फॅसिलीटीसाठी दिनांक १६.०५.२०२३ रोजी पत्र देऊन कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, बँकेने दिनांक १६.०५.२०२३ रोजीच्या पत्रानुसार ही फॅसिलीटी देऊन श्री .सुहास पाटील यांच्याच विनंतीनुसार या खात्याचा युजर–पासवर्ड वरिष्ठ लिपीक श्री. रमेश खुणे यांना दिला होता. श्री. सुहास पाटील यांच्या पत्रानुसार व्ह्यु फॅसिलीटी अथवा युजर आयडी पासवर्ड बँकेने जो दिला या बद्दल क्रिडा संकुल समिती अथवा आमच्या कार्यालयाचा आक्षेप नाही.

९०. dydsportsabad@gmail.com हा आमच्या क्रिडा संकुल समितीच्या कार्यालयाचा अधिकृत ईमेल आयडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, या ईमेल आयडीवरून बँके बरोबर जर काही संपर्क केला असेल तर तो आमच्या कार्यालयाकडुन अधिकृत संपर्क असेच समजतो. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५.०२.२०२४ रोजी याच ईमेल आयडी वरून बँकला कस्टमर रिक्वेस्ट फॉम पाठविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्या रिक्वेस्ट फॉम मध्ये जो काही मोबाईल नंबर बँकेला पुर्वी दिलेला होता तो मोबाईल नंबर बदलण्याची बँकेला विनंती करण्यात आलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या रिक्वेस्ट फॉम मध्ये बँकेला नेट बँकींग ट्रान्झाक्शन फॅसिलीटी क्रिडा संकुल समितीला त्यांच्या खात्यासाठी देण्यात यावी अशीही विनंती करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, या रिक्वेस्ट फॉमवर उपसंचालक/ सचिव श्री. सबनीस यांची सही नसल्यामुळे तो रिक्वेस्ट फॉम बँकेने फेटाळला. हे म्हणणे बरोबर होईल की, जर त्या रिक्वेस्ट फॉमवर उपसंचालक/सचिव श्री. सबनिस यांची जर सही असती तर बँकेने ती विनंती मान्य केली असती.

प्रश्न– दुस–यांदा क्रिडा संकुलच्या खात्यावर बदल मिळण्यासाठी रिक्वेस्ट क्रिडा संकुलाच्या लेटर हेडवर पाठविण्यात आले?

उत्तर–हे पत्र लेटर हेडवर क्रिडा संकुलाचे नाव नमुद करून खात्यावर बदल मिळण्यासाठी रिक्वेस्ट पाठविण्यात आली होती.

९१. हे मला सांगता येणार नाही की, आमच्या कार्यालयामार्फत आमच्या कार्यालयाचे अधिकृत लेटरहेड अथवा ईमेल आयडी बॅकेला काय असेल हे कळविले होते अथवा नाही. मला आमच्या कार्यालयाच्या लेटरहेडवर बँकेशी पत्रव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले आहे. मी पोलीसांना चौकशीत आमच्या क्रिडा संकुल समितीची अधिकृत लेटरहेड काय हे दाखविण्याकरीता त्या लेटरहेडवर झालेला काहीही पत्रव्यवहार या बद्दलचा कागद मी दिलेला नाही. फिर्यादीमध्ये बँकेला दिलले पत्र हे काय खोटे आहे अथवा काय खोटे नमुद केलेले आहे या विषयी काहीही लिहलेले नाही. बँकेचे कर्मचारी आरोपी क्र.८ व ९ हे बँकेत कधी या बँकेतील शाखेत कधी नौकरीस नियुक्त झाले हे मला माहीत नाही. हे मला माहीत नाही की, आरोपी क्र.८ व ९ यांच्या कार्याकाळात क्रिडा संकुल समितीच्या अधिकृत लेटरहेडवर बँके बरोबर काय पत्र–व्यवहार झाले. हे म्हणणे खरे आहे की, क्रिडा संकुल समितीचे अधिकृत लेटरहेड काय आहे हे आरोपी

क्र–८ व ९ यांना काय माहीती होते अथवा नाही याबद्दल मला माहीती नाही.

**१२**. **dydsportsabad@gmail.com** हा ईमेल आयडी तयार केला हा उपसंचालक/ सचिव यांच्या अधिकारात तयार झाला. हे म्हणणे खरे आहे की, हा ईमेल आयडीमध्ये बदल करायचा अधिकार सुध्दा उपसंचालक/ सचिव यांना आहे. हे म्हणणे खरे आहे की, बँकेला दिलेला नेट बँकींग संदर्भात मोबाईल नंबर बदलण्याचा अधिकार हा उपसंचालक/ सचिव यांना आहे. हे म्हणणे खरे आहे की, कार्यरत उपसंचालक/सचिव यांच्या सहीने बँकेला विनंती मोबाईल अथवा ईमेल आयडी बदल करण्यात आली तर ती स्वीकारणे बँकेवर बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या पत्रा आधारे बँकेने ट्रान्झाक्शन फॅसिलीटी देऊन मोबाईल नंबर बदलला ते पत्र उपसंचालक /सचिव यांचे सहीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, या पत्रावर उपसंचालक/सचिव श्री. संजय सबनीस यांचीच सही असल्यामुळे व ती बँकेच्या अभिलेखात बरोबर मिळून आल्यामुळे ते पत्र बँकेने स्वीकारून मागणीप्रमाणे बदल केला.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, ट्रान्झाक्शन फॅसिलीटीची मागणी व मोबाईल नंबर बदल हे करण्यासाठी काय उद्देश होता याची आरोपींना पुर्व कल्पना होती याबद्दल फिर्यादमध्ये काहीही नमुद नाही. हे मी सांगु शकनार नाही, की ही ट्राझाक्शन फॅसिलीटी व मोबाईल क्रमांक बदल झाल्यावर बँकेच्या कोणत्यावही क्रिडा संकुलाच्या व्यवहाराचा आरोपी क्र.८ व ९ ची आवश्यकता नव्हती. हे मला सांगता येणार नाही की, ट्रान्झाक्शन फॅसिलीटी दिल्यानंतर व मोबाईल क्रमांक बदलल्यामुळे क्रिडा संकुलाचे जे काही व्यवहार झाले त्यामध्ये आरोपी क्र.८ व ९ यांचा सहभाग नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, असे काही फिर्याद मध्ये नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, क्रिडा संकुलाचा जो काही व्यवहार झाला त्या रकमे पैकी काही रक्कम ही आरोपी क्र.८ व ९ यांना मिळाली असा माझा काहीही आरोप नाही.

**१४**. हे म्हणणे खरे आहे की, ऑनलाईन ट्रान्झाक्शन फॅसिलीटी व मोबाईल नंबर बदल केला म्हणून बँकेवर मी आरोप केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.८ व ९ यांचा सदर अपहाराशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तपासामध्ये नेट बँकींगच्या संदर्भात किंवा मोबाईल नंबर बदलच्या संदर्भात तपास केला व आरोपी क्र.८ व ९ यांना आरोपी केले म्हणून मी त्यांच्या विरोधात साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.८ व ९ करिता संपला</u>.**

**<u>आरोपी क्र.२ व ३ यांचे करीता श्री. पी.एस. राठी विधीज्ञ यांचे सहाकरी विधीज्ञ श्री. एस. एस. कुरील यांचे तोंडी विनंतीवरून उलटतपास दुपार नंतरच्या कालावधी पर्यंत तहकुब.</u>**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक–०३/११/२०२५

आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
निशाणी क्र.५५/क लगत

**दुपार नंतरच्या कालावधीनंतर–**
**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास शपथेवर सुरू,**
**उलटतपास आरोपी क्र. २ व ३ करीता विद्वान श्री. एस.एस. राठी, विधीज्ञ यांना**
**श्री. एस. एस. कुरील, विधीज्ञ यांच्या लिखीत सुचनेवरून**
**आरोपी क्र.२ व ३ यांनी आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारून पुढील उलटतपास सुरू–**

**९५**. माझी नियुक्त ही क्रीडा अधिकारी म्हणून झालेली होती. माझी नियुक्तीची तारीख ०४ जुलै २०२४ आहे. मी ०५ जुलै २०२४ रोजी रुजू झालो. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा व युवक सेवा तसेच विभागीय क्रिडा संकुल समिती ही दोन्ही विभाग वेगवेगळे आहेत. हे म्हणने खरे आहे की, या दोन्ही विभागाचे बँक खाते वेगवेगळे आहेत. मी उपसंचालक विभागीय क्रिडा व युवक सेवा या कार्यालयात रूजू झालो. माझी तशी नियुक्ती पत्रात नोंद आहे. मी हे दाखवू शकेल.

**आरोपीं तर्फे हरकत– वकीलांविषयी घेण्यात आली, त्यामुळे श्री. कुरील एस.एस, विधीज्ञ यांचे तोडी विनंतीवरून व तहकुब अर्ज निशाणी क्र. १६५ वरील आदेशावरून उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक–०३/११/२०२५